




# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ६ । अंक २३ । शनिवार १० ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322







# पोलिसांचे मध्यरात्री ‘ऑपरेशन ऑल आऊट’

## सराईत गुन्हेगार, अवैध धंदे आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर धडक कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अहिल्यानगर पोलीस दलाने मध्यरात्री ‘ऑपरेशन ऑल आऊट’ मोहीम राबवली. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार शुक्रवार, ९ ऑक्टोबर रोजी रात्री ११ ते शनिवार, १० ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजेपर्यंत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ही संयुक्त धडक कारवाई करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान अवैध धंदे, अग्निशस्त्रे बाळगणारे इसम, हिस्ट्रीशीटर, हद्दपार आरोपी आणि फरार गुन्हेगारांवर करडी नजर ठेवण्यात आली. तसेच शहरातील प्रमुख रस्ते व चौकांमध्ये कडक नाकाबंदी करून संशयित वाहनांची कसून तपासणी करण्यात आली. या मोहिमेत ५७ पोलीस अधिकारी, २०७ पोलीस अंमलदार आणि १०१ होमगार्ड अशा एकूण ३६५ जवानांच्या फौजफाट्याने सहभाग घेतला.

नाकाबंदी दरम्यान १,१३६ संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली; वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी २२६ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली, तर मद्यपान करून वाहने चालवणाऱ्या (ड्रंक अँण्ड ड्राईव्ह) १२ चालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

सुरक्षिततेचा उपाय म्हणून जिल्ह्यातील २५५ हॉटेल्स आणि लॉजिंगची कसून तपासणी करण्यात आली. अवैध धंदे चालवणाऱ्यांवर छापे टाकून २३ ठिकाणी कायदेशीर कारवाई करण्यात आली.

### गुन्हेगारांची झाडाझडती

या मोहिमेत जिल्ह्यातील १५९ सराईत गुन्हेगार व ५० हद्दपार आरोपींची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. याशिवाय ८२ अजामीनपात्र वॉरंटची (नॉन बेलेबल वॉरंट) यशस्वी बजावणी करण्यात आली. रेकॉर्डवरील २० फरार आणि ३६ पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध घेऊन त्यांना अभिलेखावरून कमी केले.





नवरात्र उत्सव निमित्त श्री क्षेत्र बुऱ्हानगर येथील श्री तुळजाभवानी मंदिर येथे उत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. (छाया – राजू खरपुडे ,नगर)

# नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोम्बिंग ऑपरेशन

## अजामीनपात्र वॉरंटमधील २० आरोपींना अटक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अहिल्यानगर पोलिसांनी शुक्रवारी (दि. ९) रात्री शहरात विशेष ‘कोम्बिंग ऑपरेशन’ राबवले. या धडक कारवाईत अजामीनपात्र वॉरंट असलेल्या तब्बल २० आरोपींना बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले असून, शहरातील गुन्हेगारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

दिनांक ९ ऑक्टोबरच्या रात्री अकरा वाजल्यापासून ते १० ऑक्टोबरच्या पहाटे ५ वाजेपर्यंत ■ पान ४ वर

### यांच्या मार्गदर्शनाखाली झाली कारवाई

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या नेतृत्वात कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, तोफखानाचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, भिंगार कॅम्पच्या सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्यासह सपोनि विशाल चिटणीस, पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, प्रवीण पाटील, दीपक मेढे तसेच पोहेकॉ खेडकर, तेलोरे, शिरसाठ, गवळी, इनामदार आणि इतर सर्व पोलीस अंमलदार व कर्मचाऱ्यांच्या मोठ्या पथकाने रात्रभर गस्त घालत ही मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली.

# सीना नदीच्या पूर नियंत्रण रेषेचे अद्ययावत पुनर्सर्वेक्षण करा

## पूरेषाबाधित नागरिक कृती समितीची आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे मागणी । सुमारे ३५ हजार नागरिकांच्या बांधकामांना अडथळा; नदी रुंदीकरण व खोलीकरणानंतर तांत्रिक पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातून वाहणाऱ्या सीना नदीच्या सुमारे १४ किलोमीटरच्या पात्रातील २०१९ मधील पूर नियंत्रण रेषेचे अद्ययावत पुनर्सर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी सीना नदी पूरेषाबाधित नागरिक कृती समितीच्या वतीने महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून सीना नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाचे काम सुरू असल्याने या कामांचा पूरप्रवाहावर होणारा परिणाम तपासून पूर नियंत्रण रेषेचे तांत्रिक पुनर्मूल्यांकन करावे, अशी भूमिका समितीने मांडली.

सीना नदीच्या विद्यमान पूर नियंत्रण रेषेमुळे शहरातील प्लॉटधारक, शेतकरी, जमीनमालक आणि रहिवाशांच्या विकासकामांवर परिणाम होत असल्याचे समितीने निवेदनात म्हटले आहे. सुमारे ३५ हजार नागरिकांना पूररेषेमुळे बांधकाम करता येत नसल्याचा दावा समितीने केला. काही लेआउटला मंजुरी मिळालेली असतानाही पूररेषेच्या निर्बंधांमुळे बांधकामासाठी परवानगी मिळण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या मालमत्तेच्या विकासावर मर्यादा येत असून, महानगरपालिकेच्या महसुलावरही परिणाम होत असल्याचे समितीने नमूद केले.

समितीच्या म्हणण्यानुसार, सीना नदीच्या उगमस्थानापासून अहिल्यानगर शहराचे अंतर सुमारे १५ किलोमीटर आहे. नदीला यापूर्वी मोठा पूर आल्याची किंवा त्यात जीवितहानी झाल्याची घटना नसल्याचेही समितीने निवेदनात म्हटले आहे. मात्र, पूर नियंत्रण रेषेबाबतचा निर्णय केवळ या मुद्द्यांवर आधारित न ठेवता अद्ययावत तांत्रिक सर्वेक्षण, नदीची वहनक्षमता, ■ पान ४ वर

### नवीन वीज जोडणी व भारवाढ होण्याकरीता

# उद्योजकांचा महावितरण कार्यालयावर मोर्चा

## डिसेंबर पर्यंत होणार काम । एमआयडीसीतील उद्योगांना अखंडित वीजपुरवठा देण्याची मागणी; अतिभाराने वारंवार वीजखंडित होत असल्याने आर्थिक नुकसानीचा फटका




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रतिनिधी अहिल्यानगर एमआयडीसी परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने औद्योगिक उत्पादनावर परिणाम होत असून उद्योजकांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. या समस्येकडे महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीजच्या ( आमी) वतीने महावितरणच्या अहिल्यानगर येथील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी आमीचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, उपाध्यक्ष राजेंद्र शुके,रोहन गांधी, सतिश गवळी, मिलिंद कुलकर्णी, राजेंद्र कटारिया, दिलीप अकोलकर, मिलिंद भद्रे,राजेंद्र कुलकर्णी, सुमित सोनवणे, रोहन गांधी , प्रवीण जुंदरे सतीश गवळी, अमोल घोलप ,नावंदर,सागर निंबाळकर, आदींसह उघोजक यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवार निवेदन दिले.

अहिल्यानगर एमआयडीसी परिसरात मागील सहा ते सात महिन्यापासून सातत्याने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत आहेत विशेषता डी एफ ए आणि एल ब्लॉक मध्ये दररोज वीजपुरवठा खंडित होत आहे यामुळे उद्योजकांना मोठी आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे तसेच एमआयडीसीतील इतर ब्लॉक मध्ये वीजपुरवठाच्या लपंडाव सुरू आहे

जयद्रथ खाकाळ म्हणाले वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे उत्पादन प्रक्रियेत अडथळा निर्माण होत आहे मशीनरी बंद पडणे कच्च्या मालाची नुकसान होणे उत्पादन क्षमतेवर परिणाम होणे वेळेत ऑर्डर पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत याचा थेट परिणाम उद्योजकांच्या उत्पादन खर्चावर व आर्थिक व्यवहारावर होत आहे ही परिस्थिती अशीच राहिल्यास अनेक कारखाने बंद ठेवण्याची ■ पान ४ वर

# केजरीवाल, ममता बॅनर्जी, अभिजीत दिपके यांच्यासह हजारो आंदोलक दिल्लीत स्थानबद्ध

**मुंबई । वृत्तसंस्था–** राज्यात एकीकडे एम पी एस सी विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असताना दुसरीकडे राजधानी दिल्लीतील जंतरमंतरवर कॉकरोच जनता पार्टीने आंदोलनाची हाक दिली आहे. त्यासाठी, संस्थापक अभिजीत दिपकेंसह सीजेपीचे पदाधिकारी दिल्लीत पोहोचले असता पोलिसांनी सर्वांना विमानातूनच ताब्यात घेतले. मात्र, दुसरीकडे दिल्लीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात जेन-झी, विद्यार्थी संघटना आणि विरोधी पक्षातील पदाधिकारीही उतरल्याचं पाहायला मिळत आहे. त्याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी धरपकड सुरू केली असून अरविंद केजरीवाल ममता बॅनर्जी आदी बड्या नेत्यांसह हजारो आंदोलकांना स्थानबद्ध केले आहे.

एसआयआर रद्द करणे आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सीजेपीने आज दिल्लीत आंदोलनाची हाक दिली होती. तर, काँग्रेससह इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांनीही कालच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन ज्ञानेश कुमारांविरुद्ध निवेदन दिले आहे. त्याच, पार्श्वभूमीवर आज सीजेपीच्या आंदोलनात जेन-झीसह विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारीही सहभागी झाल्याचं दिसून आलं. त्यामुळे, दिल्ली पोलिसांनी निमलष्कर दलासह पोलिसांचा फौजफाटा रस्त्यावर उतरवला असून अनेकांना ताब्यात घेण्यात आलंय.

■ पान ४ वर

### राजधानीत अभूतपूर्व सुरक्षा

काही दिवसांपूर्वी दिल्लीत आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचारातून धडा घेऊन सरकारने खबरदारीचे सर्व उपाय अवलंबले आहेत. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीमध्ये अभतपूर्व सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आलेली असून कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिस यंत्रणा लक्ष ठेवून आहे.

### अजिंक्य शिंदेंकडे सीजेपीची धुरा

कॉकरोच जनता पार्टीच्या नियोजित आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रीय संघटन प्रभारी अजिंक्य शिंदे करत आहेत. विमानतळावर विमान उतरताच संस्थापक अभिजीत दिपके आणि आयोजक सौरव दास व आशुतोष रांका यांना दिल्ली पोलिसांनी विमानातूनच ताब्यात घेतल्यानंतर या आंदोलनाची धुरा अजिंक्य शिंदेंकडे आली. अटकेची शक्यता लक्षात घेऊन दिपके यांनी शुक्रवारी रात्री व्हिडिओ संदेश रेकॉर्ड केला होता, पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर सीजेपीकडून तो व्हिडिओ प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यानुसार, अजिंक्य शिंदे यांच्या पाठीशी आंदोलकांनी एकजूट होण्याचे आवाहन त्यांनी केले: ‘‘तुम्ही हा व्हिडिओ पाहत असाल, तर आशुतोष रांका, सौरव दास आणि मला ताब्यात घेतले आहे. आंदोलन इथे संपत नाही. आम्ही ताब्यात असेपर्यंत अजिंक्य शिंदे जंतर मंतरवरील आंदोलनाचे नेतृत्व करतील. हा लढा पुढे नेणाऱ्या शिंदे यांना साथ द्या, असे आवाहन दिपके यांनी केले आहे.

## दै. आकर्षण निवडक

### जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने पाणी बचत काळाची गरज विषयावर खुली निबंध स्पर्धा

अहिल्यानगर- एल निनोच्या प्रभावामुळे सध्या सर्वत्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असून येत्या काळात दुष्काळाची दाहकता तीव्र होऊ शकते. या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि काटकसरीने वापर आवश्यक ठरत आहे. नगर शहरातही महानगरपालिकेने पाणी कपात जाहीर केली आहे.



दुष्काळी परिस्थितीशी दोन हात करताना प्रत्येकाने पाणी बचत करणे आवश्यक असून याबाबत जनजागृती करण्यासाठी जय आनंद महावीर युवक मंडळाने पाणी बचत काळाची गरज या विषयावर खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी दिली.मंडळाचे कार्याध्यक्ष सत्येन मुथा आणि सेक्रेटरी आनंद मुथा यांनी सांगितले की, यावर्षी पावसाने ओढ दिल्याने सर्वत्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात आतापासूनच पाणी टंचाई जाणवत आहे. शहरात तुलनेने चांगली परिस्थिती असली तरी धरणांमधील पाणीसाठा पुढील पावसाळ्यापर्यंत जपून वापरण्याचे आव्हान आहे. नगर शहरात महानगरपालिकेने आताच पाणी कपात जाहीर केली आहे. या परिस्थितीत सर्वांनीच उपलब्ध पाणी जपून वापरणे आवश्यक आहे. यासाठीच निबंध स्पर्धेतून नगरकरांना पाणी बचतीबाबतच्या उपाययोजना शब्दबद्ध करता येतील. सध्या दसरा, दिवाळीसारख्या मोठ्या सण उत्सवांचा माहोल आहे. याकाळात साफसफाईसाठी मोठ्या प्रमाणावर पाणी वापरले जाते. हे पाणी जपून कसे वापरावे, पुढील आठ महिने पाण्याची काटकसर कशी करावी, वैयक्तिक योगदान कसे असावे, जनावरे, पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था कशी करावी, पाण्याचा अपव्यय कसा टाळावा अशा गोष्टींचा उहापोह निबंधातून होणे अपेक्षित आहे. निबंध सुवाच्च हस्ताक्षरात लिहिलेले आणि १ हजार शब्द मर्यादेत असावेत. प्रथम तीन विजेत्यांना आकर्षक बक्षिसे दिली जातील. स्पर्धकांनी आपले निबंध दि. २० ऑक्टोबर पर्यंत रोहित कॉस्मेटिक, नवीपेठ किंवा वर्धमान प्लायवूड सेंटर, मुनोत इस्टेट, स्टेशन रोड, अहिल्यानगर येथे जमा करावेत, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

### विजय भालसिंग यांचा गोवा सोशल एक्सलन्स अवॉर्डने गौरव

अहिल्यानगर - सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक तसेच निसर्ग व पर्यावरण क्षेत्रात गेल्या दोन दशकांपासून निस्वार्थपणे कार्य करणारे वाळकी (ता. अहिल्यानगर) येथील सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांना स्वर कला संघ, गोवा आणि समाज कल्याण संचालनालय, गोवा सरकार यांच्या वतीने 'गोवा सोशल एक्सलन्स अवॉर्ड २०२६' ने गौरविण्यात आले. त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक व पर्यावरणपूरक कार्याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. पणजी येथे आयोजित करण्यात आलेल्या 'गोवा सोशल एक्सलन्स अँड इम्पॅक्ट समिट २०२६' मध्ये मान्यवरांच्या हस्ते भालसिंग यांचा गौरव करण्यात आला. 'सेवेपासून सामाजिक परिवर्तनापर्यंत' हे ब्रीदवाक्य घेऊन या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक दिशा देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव या सोहळ्यात करण्यात आला. या कार्यक्रमास आमदार तथा गोव्याचे माजी कला, क्रीडा व संस्कृती मंत्री गोविंद गावडे, आमदार प्रेमेंद शेटे तसेच अभिनेत्री श्रुती पारकर, संस्थेचे अध्यक्ष निहाल सावंत, स्वागताध्यक्ष प्रा.डॉ. बी.एन. खरात उपस्थित होते. विजय भालसिंग हे गेल्या दोन दशकांपासून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रियपणे योगदान देत आहेत. वाळकी येथील रहिवासी असलेले भालसिंग एसटी बँकेची नोकरी सांभाळत सामाजिक कार्यासाठी वेळ देत आहेत.

### छगन राऊत यांचे दुःखद निधन

अहिल्यानगर- बालिकाश्रम रोड धर्माधिकारी मळा येथील रहिवासी श्री छगन तुकाराम राऊत (वय५४)यांचे आज पहाटे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. अहिल्यानगर येथील श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटी मध्ये गेली ३० वर्ष ते वसुली अधिकारी म्हणून काम पाहत होते. अत्यंत शांत व संयमी आणि धार्मिक स्वभावाचे ते होते.



#### सोमवंशी क्षत्रिय कासार समाज, अहिल्यानगर

# श्री कालिका देवी संस्थान नवरात्र उत्सव अध्यक्षपदी भूपेंद्र रासने

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सोमवंशी क्षत्रिय कासार समाजाचे, श्री कालिका देवी संस्थान अहिल्यानगर येथे सालाबाद प्रमाणे आयोजित करण्यात येणाऱ्या श्री कालिका माता शारदीय नवरात्रोत्सव समितीच्या अध्यक्षपदी श्री. भूपेंद्र नंदकुमार रासने यांची निवड करण्यात आली. नवरात्र उत्सव २०२६ च्या नियोजनासाठी श्री कालिका देवी संस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष श्री. संदीप सुधाकर डांगरे यांच्या अध्यक्षतेखाली विश्वस्त मंडळ आणि समाज बांधव यांची घासगल्ली येथील श्री कालिका मंदिर येथे बैठक संपन्न झाली. यावेळी मंदिरामध्ये सालाबाद प्रमाणे साजरा करण्यात येणाऱ्या नवरात्र महोत्सवासाठी समितीची स्थापना करण्यात आली.





नवरात्र महोत्सव २०२६ च्या समितीसाठी अध्यक्ष म्हणून श्री. भूपेंद्र नंदकुमार रासने, यांची तर उपाध्यक्ष म्हणून श्री ज्ञानेश्वर भगवानराव दहिवाले आणि ओंकार मंगेश डांगरे यांची निवड करण्यात आली. या समितीमध्ये श्री. संदीप संजय पाथरकर सेक्रेटरी, श्री. दीपक बाबुराव देहेरेकर, खजिनदार आणि श्री. अभिजीत नागनाथ शेठ पाथरकर सहखजिनदार पदी निवड करण्यात आली. तसेच समितीमध्ये सदस्य म्हणून राजेंद्र रघुवीर रासने, सौरभ राजेंद्र भांडेकर, सतीश काशिनाथ रासने, सुधीर वसंतराव रासने, विशाल दिनकर कडूसकर, दिलीप दत्तात्रय रासने, सर्वेश सोमेश्वर डिक्कर, मंदार चंद्रशेखर डांगरे, पवन साईनाथ रासने, विशाल राजेंद्र येंडे, शशांक सतीश रासने, अच्युत ज्ञानेश्वर रासने, प्रसाद ज्ञानेश्वर रासने, सोहम अमोल झोटिंग, यांचा समावेश आहे.

श्री कालिका देवी संस्थान विश्वस्त मंडळ, कालिका महिला मंडळ व कालिका युवक मंडळ यांच्या सहकार्याने श्री कालिका माता शारदीय नवरात्र महोत्सव २०२६, रविवार दिनांक ११ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता घटस्थापना व अभिषेक पूजन करण्यात येणार आहे. घटस्थापने पासून ते २५ ऑक्टोबर कोजागिरी पौर्णिमा पर्यंत नवरात्र महोत्सवात भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांचा तपशील आपणास कालिका माता मंदिर या ठिकाणी पहावयास मिळेल तरी या कार्यक्रमासाठी कासार समाज बांधवांसह अहिल्यानगर शहरातील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन नवरात्र उत्सव समितीच्या वतीने अध्यक्ष भूपेंद्र रासने यांनी केले आहे.

नवरात्र उत्सव मध्ये श्री कालिका देवी मूर्ती समोर पहिल्या माळेपासून ते नवव्या माळेपर्यंत वेगवेगळ्या प्रकारचे वाहन तयार करण्यात येत असतात हे तयार करण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून मूर्तिकार श्री. धनंजय भालचंद्र वेळापुरे हे करतात या वाहनांमध्ये कमळ, नंदी, वाघ, गजराज ,मोर ,सिंह, उंट, गरुड, राजहंस, अश्वरथ, गोमाता, हरीण, यांचा समावेश आहे. दररोज रात्री नऊ वाजता श्री कालिका मातेची आरती करण्यात येते त्या आरतीचे आणि प्रसाद वाटपाचे यजमानपद दररोज समाजातील वेगवेगळ्या कुटुंबाकडे असते. आरतीसाठी दररोज संध्याकाळी कासार समाज बांधवांसह शहरातील भक्तगण आणि परिसरातील व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित असतात. शुक्रवार दिनांक २३ ऑक्टोबर रोजी नवरात्र उत्सवा निमित्ताने श्री कालिका देवी मंदिरामध्ये महाप्रसाद भंडारा आयोजित करण्यात येतो तसेच रविवार दिनांक २५ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमा समाज बांधवांच्या उपस्थिती साजरी करण्यात येते. अहिल्यानगर शहरातील नामवंत सनई चौघडा वादक दररोज सकाळी आणि संध्याकाळी आपले वादन कालिका माते समोर सादर करतात. सनई चौघड्याच्या मंजुळ स्वरात नवरात्र उत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.

#### डिजिटल युगातही टपाल सेवेचे महत्व कायम

## जागतिक टपाल दिनानिमित्त अधिकारी कर्मचाऱ्यांचा सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अत्याधुनिक तंत्रज्ञान व डिजिटल युगातही टपाल सेवेचे महत्त्व कायम आहे.

भारत सरकारची टपाल सेवा देशाच्या कानाकोपऱ्यातील नागरिकांना अधिकृत व न्यायालयीन पत्रव्यवहार, पार्सल वितरण, आर्थिक सेवा आणि विविध शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. टपाल सेवेच्या योगदानाबद्दल ०९ ऑक्टोबर जागतिक टपाल दिनानिमीत्त स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फौंडेशनच्यावतीने आनंदी बाजार सब पोस्ट ऑफिसमधील सब पोस्ट मास्टर स्नेहल एखे, असि. पोस्ट मास्टर सत्यप्रिया सिंग, जीडीएस लिंबाजी गायकवाड, शिवम पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी उदय गंधे व ग्राहक उपस्थित होते.



टपाल सेवेमागे हजारो अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे परिश्रम असतात. ऊन, वारा, पाऊस आणि प्रतिकूल परिस्थितीतही नागरिकांपर्यंत पत्रे, पार्सल आणि महत्त्वाची कागदपत्रे पोहोचविणारे टपाल कर्मचारी समाजातील महत्त्वाचे घटक आहेत.

त्यांच्या कार्याचा गौरव करणे, त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आणि टपाल सेवेविषयी समाजात आदराची भावना निर्माण करणे हा या सन्मानाचा मुख्य उद्देश असल्याचे अभय ललवाणी यांनी यावेळी सांगितले.

## 'सोयीनुसार रंग बदलणं म्हणजे काँग्रेसचं राजकारण - रविंद्र चव्हाण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काँग्रेसच्या दुटप्पी राजकारणावर टीका करणारी सोशल मीडिया पोस्ट शेअर केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा कोलकाता येथील व्हिडिओ शेअर करत त्यांनी काँग्रेसवर जोरदार घणाघात केला. पश्चिम बंगाल भाजप विधिमंडळाच्या बैठकीत केंद्रीय गृहमंत्री बोलत होते.



रविंद्र चव्हाण यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले की, सोयीनुसार रंग बदलणं म्हणजे काँग्रेसचं राजकारण! ज्या राज्यांमध्ये तब्बल ४०-४० वर्षे काँग्रेसचा मुख्यमंत्री होऊ शकला नाही, तिथे त्यांच्याच मित्रपक्षांची सत्ता होती. व्होट चोरीचा आरोप करणारे राहुल गांधी आणि काँग्रेस नेते याबद्दल तोंडातून 'ब्र' देखील काढणार नाहीत. 'चोराच्या उलट्या बोंबा' म्हणतात ते हेच!

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्र्यांनी आपल्या भाषणात देशभरातील विविध राज्यांमध्ये किती वर्षांपासून काँग्रेसचा एकही मुख्यमंत्री झालेला नाही, याचा पाढा वाचला. ते म्हणाले की, काँग्रेसने या पराभवानंतर आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे. राहुल गांधी नेते झाल्यापासून देशातील नागरिक वेळोवेळी त्यांच्याविरोधात कौल देत आहेत आणि राहुलजींच्या नेतृत्वात इंडिया आघाडी पुन्हा मोडण्यास सुरुवात झाली आहे. काँग्रेसच्या या अपयशावर बोट ठेवताना, रविंद्र चव्हाण यांनी पुन्हा एकदा भाजपची भूमिका ठामपणे मांडली आहे.

## आर्थिक फसवणूक प्रकरणातील आरोपी संदीप थोरात यांचा मृत्यू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शेवगाव येथील आर्थिक फसवणूक प्रकरणातील आरोपी संदीप सुधाकर थोरात यांचा नाशिक येथील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. फुफ्फुसाच्या आजारामुळे त्यांच्यावर गेल्या चार दिवसांपासून उपचार सुरू होते.



सह्याद्री मल्टिसिटी निधी कंपनी आणि क्लासिक ब्रीज मनी सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष असलेल्या थोरात यांच्यावर गुंतवणूकदारांना दरमहा १५ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप होता. या प्रकरणी शेवगाव पोलिसांनी त्यांना अहिल्यानगरमधील पाईपलाईन रस्ता परिसरातून अटक केली होती.

## दुष्काळ निवारणासाठी विलास भुमरे मैदानात; १२८ गावांचा घेतला आढावा

### ७२३ रोजगार हमीची कामे सुरू करण्याचे निर्देश; एक लाख जनावरांसाठी चारा छावण्यांचे नियोजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी आमदार विलासबापू भुमरे यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. यावेळी १२८ गावांतील पाणीपुरवठा, रोजगार, पीकविमा, पीककर्ज आणि जनावरांच्या चाऱ्याच्या प्रश्नांवर चर्चा करून तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर ७२३ कामे तातडीने सुरू करून नाला खोलीकरण, गाळ काढणे आणि सिंचन तलावांच्या खोलीकरणातून मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. पीकविम्याचा लाभ पात्र शेतकऱ्यांना मिळावा, तसेच सिबिल स्कोअरचे कारण देऊन पीककर्जासाठी शेतकऱ्यांची अडवणूक करू नये, अशा सूचना बँक अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. कर्ज नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांची धिंड काढण्याचा इशाराही भुमरे यांनी दिला.

दरम्यान, तालुक्यातील सुमारे एक लाख जनावरांसाठी चार ते पाच चारा छावण्या सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले. पाणीटंचाईग्रस्त गावांचे प्रस्ताव, बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडणे आणि अनधिकृत कृषिपंप बंद करण्याबाबतही चर्चा झाली. दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी सर्व विभागांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश आमदार भुमरे यांनी दिले.

# पैठणमध्ये आरक्षित भूखंडावर भूमाफियांचा डोळा?

### 'बांध'वरून भूखंड विक्रीची चर्चा; १८ मीटर रस्त्याच्या जागेच्या व्यवहारावरही प्रश्नचिन्ह

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शहरातील मौलाना साहेब दर्गा परिसरातील कतलखान्यासाठी आरक्षित असलेल्या नगरपरिषदेच्या भूखंडावर कथित भूखंड माफियांनी डोळा ठेवल्याची चर्चा सुरू झाली आहे. या आरक्षित भूखंडावरून 'बांध'च्या माध्यमातून जागा विक्रीचे व्यवहार होत असल्याचा आरोप पुढे आल्याने शहरात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, विकास आराखड्यानुसार प्रस्तावित असलेल्या १८ मीटर रुंदीच्या रस्त्याच्या जागेवरही कथित व्यवहार झाल्याची चर्चा असल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

नगरपरिषदेच्या विकास आराखड्यात सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या जमिनीवर खासगी स्वरूपाचे व्यवहार सुरू असल्याचा आरोप गंभीर मानला जात आहे. संबंधित जागेवर काही ठिकाणी घरांचे बांधकाम सुरू असल्याचेही सांगण्यात येत आहे. त्यामुळे आरक्षित भूखंडावर खासगी बांधकामे कशी उभी राहत आहेत, तसेच जागेच्या व्यवहारांना नेमका कोणाचा आशीर्वाद आहे, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

**आरक्षित जागेच्या व्यवहारांना कोणाचा आशीर्वाद?**

सार्वजनिक प्रयोजनासाठी राखीव असलेल्या जमिनीचा वापर नियोजित कारणासाठी होणे अपेक्षित असताना, या जागेवर कथित खरेदी-विक्रीचे व्यवहार होत असल्याची चर्चा आहे. 'बांध'च्या माध्यमातून नागरिकांकडून पैसे घेतले जात असल्याचा आरोपही पुढे आला आहे. मात्र, या व्यवहारांची सत्यता, त्यामागील व्यक्ती आणि संबंधित जमिनीची कायदेशीर स्थिती याबाबत अधिकृत माहिती समोर येणे आवश्यक आहे. आरक्षित भूखंडाची विक्री अथवा हस्तांतरण करण्याचा अधिकार संबंधित व्यक्तींना आहे का, जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे कोणती आहेत आणि व्यवहार कोणत्या आधारावर केले जात आहेत, याची प्रशासनाने तपासणी करणे गरजेचे आहे.

**१८ मीटर रस्त्याची जागाही वादात?**

शहराच्या विकास आराखड्यानुसार प्रस्तावित असलेल्या १८ मीटर रुंदीच्या रस्त्याच्या जागेबाबतही कथित व्यवहार झाल्याची चर्चा आहे. भविष्यात या मार्गाचे काम सुरू झाल्यास संबंधित जागेवरील बांधकामे आणि व्यवहार विकासकामांसाठी अडथळा ठरू शकतात. त्यामुळे विकास आराखड्यातील रस्त्याची हद्द निश्चित करून प्रत्यक्ष जागेची मोजणी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

**नगरपरिषद आणि महसूल प्रशासनाने चौकशी करावी**

या संपूर्ण प्रकरणात नगरपरिषद प्रशासन, भूमिअभिलेख विभाग आणि महसूल यंत्रणेने संयुक्तपणे चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आरक्षित भूखंडाचे अभिलेख, मालकी हक्क, बांधकाम परवानग्या आणि कथित व्यवहारांची कागदपत्रे तपासून वस्तुस्थिती स्पष्ट करावी. नियमबाह्य व्यवहार किंवा बांधकामे आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आरक्षित भूखंडावरील कथित व्यवहारांची चौकशी करून प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेणार, याकडे आता पैठणकरांचे लक्ष लागले आहे.

# साखर कामगारांचा २२ ऑक्टोबरपासून बेमुदत संपाचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघ आणि महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ या दोन्ही राज्यव्यापी मान्यताप्राप्त व प्रातिनिधिक संघटनांनी राज्यातील साखर व जोडधंद्यातील कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी दि. २२ ऑक्टोबर २०२६ पासून बेमुदत संप पुकारण्याचा निर्णय घेतला आहे. मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास २२ ऑक्टोबर रोजी पहिल्या पाळीपासून महाराष्ट्रातील साखर व जोडधंद्यातील कामगार-कर्मचारी काम बंद आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष कॉम्रेड पी,के मुडे व सरचिटणीस कॉम्रेड आनंद वायकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे.

साखर उद्योगातील कामगारांच्या वेतनवाढीसंदर्भात महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या त्रिपक्ष समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने मालक प्रतिनिधी आणि कामगार प्रतिनिधी यांच्यात दि. २३ जुलै २०२५ रोजी करार करण्यात आला होता. या कराराची अंमलबजावणी करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, खाणीकर्म विभागाने शासन निर्णय क्र. ससाका-२०२४/प्र.क्र./४९/काम-३, मंत्रालय, मुंबई यांच्या माध्यमातून दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी परिपत्रक प्रसिद्ध केले होते.





त्यानुसार राज्यातील अनेक साखर कारखान्यांनी सदर कराराची अंमलबजावणी सुरू केली आहे. महाराष्ट्र शासन आणि साखर कामगार संघटनांमध्ये त्रिपक्ष समितीमार्फत दि. १ एप्रिल २०२४ ते दि. ३१ मार्च २०२९ अखेरचा करार अस्तित्वात असून, हा करार महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ अन्वये करण्यात आलेला असल्याचे संघटनांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रातील साखर कामगार तसेच जोडधंद्यातील कामगारांच्या हक्कांशी संबंधित महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ अर्थात बीआयआर कायदा शासनाने रद्द केला आहे. त्यामुळे साखर व जोडधंद्यात कार्यरत असलेल्या सुमारे दोन ते अडीच लाख कामगारांना न्याय्य हक्कांपासून वंचित राहावे लागण्याची शक्यता असल्याने कामगारांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला असल्याचे संघटनांनी म्हटले आहे.

राज्यातील साखर कामगारांचे एक हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक थकीत वेतन असल्याचा दावा संघटनांनी केला आहे. त्याचबरोबर अनेक साखर कारखाने अनेक वर्षांपासून बंद अथवा आजारी अवस्थेत आहेत. या कारखान्यांमधील कामगारांच्या रोजीरोटीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. साखर कारखान्यांमध्ये रोजंदारी व कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना कारखान्याच्या सेवेत सामावून घेऊन त्यांना वेतनश्रेणी लागू करावी, अशीही प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

या मागण्यांसंदर्भातील मसुदा पत्र दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी मुख्यमंत्री, सहकार मंत्री, कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य साखर कारखाना संघाचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक तसेच राज्याचे कामगार आयुक्त यांना देण्यात आल्याचे संघटनांनी सांगितले.

शासनाने दि. २२ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ अर्थात बीआयआर कायदा रद्द करण्याबाबत अध्यादेश काढला. या निर्णयाच्या विरोधात महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ आणि महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघ या दोन्ही मान्यताप्राप्त संघटनांनी लोकशाही मार्गाने मोर्चा काढून आपला विरोध नोंदविला आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### नवरात्रौत्सव निमित हिंदु युवक-युवतींसाठी हर घर योद्धा शौर्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

अहिल्यानगर - हिंदु जनजागृती समितीच्या वतीने हिंदु युवक-युवतींसाठी स्वसंरक्षण आणि धर्मशिक्षण देणाऱ्या हर घर योद्धा - शौर्य प्रशिक्षण शिबिरा चे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी नवरात्र शौर्याने गाजवूया, या संकल्पनेतून हे शिबिर घेतले जात आहे.




शिबिरात काय शिकवले जाणार?
१. लाठी-काठी युद्ध कला २. नानचाकू
३. मिक्स मार्शल आर्ट ४. धर्मशिक्षण या शिबिरातून युवक-युवतींना स्वसंरक्षणासोबतच शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा उद्देश असल्याचे जास्तीत जास्त संख्येने या शिबिरात सहभागी व्हावे असे आवाहन समिती तर्फे करण्यात आले आहे
दिनांक : ११ ऑक्टोबर २०२६ ते १८ ऑक्टोबर २०२६ स्थळ : १)मार्कंडेय संकुल, दातरंगे मळा, नेप्ती नाका, अहिल्यानगर वेळ : सायंकाळी ६ ते ७.३० वाजेपर्यंत २) श्री दत्त मंदिर, शास्री नगर, केडगाव, अहिल्यानगर वेळः साय ७ ते ८.३० संपर्क : ८३२९३०२९५५ या प्रशिक्षणासाठी नोंदणी सुरू असून कोड स्कॅन करून नोंदणी करता येणार आहे. जास्तीत जास्त हिंदू युवक-युवतींनी या शिबिराचा लाभ घ्यावा,
टीप : इच्छुक युवक युवतींनी ://./६९ या लिंक वर क्लिक करून नोंदणी करणे आवाहन हिंदु जनजागृती समितीने केले आहे.

### नाना पाटेकरांच्या स्मृतींना 'नाम-सेवा'तून कृतीशील अभिवादन

अहिल्यानगर - संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण, मृदसंधारण आणि शेतीतील ओलावा संवर्धनाला चालना देण्यासाठी पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने 'नाम-सेवा' हा उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या शेतकरीसेवेच्या कार्यातून प्रेरणा घेऊन श्रमदान आणि लोकसहभागाच्या माध्यमातून जलसंवर्धनाची कामे करण्यावर या उपक्रमात भर देण्यात येणार आहे. नगर तालुक्यातील वाळुंज येथून या मोहिमेची सुरुवात करण्याचे नियोजन असून, दख्खन पठारावरील दुष्काळप्रवण भागांत पाणी आणि जमिनीतील ओलावा टिकविण्यासाठी जनसहभाग वाढविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाइनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली. या संकल्पनेत श्रमदान, शेतीतील पाणी व्यवस्थापन आणि वृक्षसंवर्धन यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. नाना पाटेकर आणि अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत, जलसंधारण आणि ग्रामीण भागातील विविध सामाजिक उपक्रमांसाठी योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्यातून प्रेरणा घेऊन शेतकरी आणि ग्रामीण समुदायाच्या पाणीविषयक प्रश्नांवर प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून काम करण्याची भूमिका पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेने घेतली आहे.'नाम-सेवा' या उपक्रमातून केवळ श्रद्धांजलीपुरते मर्यादित न राहता श्रमदान, पाण्याचे योग्य नियोजन आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन यांसारख्या कृतींना प्राधान्य देण्याचा विचार मांडण्यात आला आहे. गावातील नागरिक, शेतकरी, युवक, महिला आणि स्वयंसेवक यांच्या सहभागातून स्थानिक गरजांनुसार कामे करण्याचे नियोजन आहे. पावसाचे पाणी वेगाने वाहून जाण्याऐवजी ते योग्य ठिकाणी अडवून जमिनीत मुरविणे, शेतातील मातीची धूप कमी करणे आणि पिकांच्या मुळांजवळील ओलावा टिकविणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्देश आहेत. यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार शेतबांधांची देखभाल, समतल चर, लहान जलसंधारण रचना आणि गाळ अडविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा विचार करण्यात येणार आहे. पाण्याचे नियोजन करताना जमिनीचा उतार, मातीचा प्रकार, खडकांची रचना, पर्जन्यमान आणि भूजलपातळी यांचा अभ्यास महत्त्वाचा ठरणार आहे.

# आरक्षण कायम; ४५ मीटर इमारतीला परवानगी!

## पत्रकार चौकातील महावीर कंपनीचा प्रकल्प चौकशीच्या कक्षेत; त्रिसदस्यीय समितीला तात्काळ अहवाल देण्याचे निर्देश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सार्वजनिक व निमसार्वजनिक आरक्षण असलेल्या जमिनीवर सुमारे ४५ मीटर उंच व्यावसायिक व निवासी इमारतीला परवानगी दिल्याच्या तक्रारीची नगर रचना संचालनालयाने दखल घेतली आहे. पत्रकार चौकातील सारडा महाविद्यालयाजवळील महावीर कंपनीच्या या प्रकल्पाबाबत नगर रचना संचालक जितेंद्र ल. भोपळे यांनी त्रिसदस्यीय समिती नेमून स्वयंस्पष्ट अभिप्राय व योग्य शिफारशींसह अहवाल तात्काळ सादर करण्याचे आदेश दिले आहेत. नाशिक विभागाचे सहसंचालक नगर रचना आ. टि. बागुल हे समितीचे अध्यक्ष आहेत. कोकण विभागाचे सहसंचालक नगर रचना वि. ल. वाघमोडे आणि नाशिक विभागाच्या सहाय्यक संचालक नगर रचना दीपाली म. पाटील यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी या प्रकल्पाच्या परवानगी प्रक्रियेवर आक्षेप घेत प्रधान सचिव, नगर विकास विभाग आणि नगर रचना संचालकांकडे तक्रार केली होती. बांधकाम थांबवून संबंधित परवानग्यांवर कार्यवाही न झाल्यास १२ ऑक्टोबर रोजी पुणे येथील संचालक कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला होता. या पार्श्वभूमीवर ९ ऑक्टोबर रोजी समिती नेमण्याचे आदेश जारी झाले.
मौजे सावेडी येथील जुना सर्वे नं. १६१, नगर रचना योजना क्र. ४ मधील अंतिम भूखंड क्र. ४३-अ हे या प्रकल्पाचे ठिकाण आहे. तक्रारीनुसार, भूखंडावरील सार्वजनिक व निमसार्वजनिक आरक्षण वैध शासकीय अधिसूचनेद्वारे रद्द अथवा बदललेले नसतानाही व्यावसायिक व निवासी बांधकामाला मंजुरी देण्यात आली. विद्यमान महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, तत्कालीन सहाय्यक संचालक नगर रचना स्नेहल यादव आणि नगररचनाकार वैभव जोशी यांच्या प्रस्ताव तपासणी, शिफारस व मंजुरीतील भूमिकेवर आक्षेप घेण्यात आला आहे.

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली२०२० मधील पृष्ठ क्र. २१४ वरील सार्वजनिक व निमसार्वजनिक आरक्षणाच्या विकासासंबंधी तरतुदींकडेही लक्ष वेधण्यात आले आहे. या तरतुदींमध्ये शासकीय कार्यालये, अग्निशमन केंद्र व तत्सम सुविधांचा उल्लेख आहे. मालकाला पर्यायी पद्धतीने विकासाची परवानगी देताना विहित क्षेत्राचा स्वतंत्र भूखंड आणि त्यावरील बांधलेली सुविधा नियोजन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याच्या अटी आहेत. या अटींची पूर्तता केल्यानंतर उर्वरित जमिनीवर लगतच्या विभागात अनुज्ञेय उपयोग करता येतात. मात्र, आरक्षणाच्या प्रयोजनासाठी आवश्यक सुविधा व हस्तांतरणाच्या अटी पूर्ण न करताच या प्रकल्पाला परवानगी दिल्याचा आरोप आहे.

परवानगी आधी, प्रत्यक्ष ताबा नंतर विकास प्रस्ताव ३० जून २०२५ रोजी सादर करण्यात आला आणि महानगरपालिकेने ८ नोव्हेंबर २०२५ रोजी बांधकाम परवानगी दिली. ताबा हस्तांतरण दस्तऐवजानुसार मात्र भूखंडधारकांना प्रत्यक्ष ताबा १० मे २०२६ रोजी मिळाला. सन १९६५ पासून हिंद सेवा मंडळाच्या ताब्यात असलेल्या जमिनीचा प्रत्यक्ष ताबा मिळण्यापूर्वीच मंजुरी देण्यात आल्याचा मुद्दा तक्रारीत मांडण्यात आला आहे.

मालमत्ता पत्रकावरील क्षेत्र १४,१८६.४० चौ.मी., तर हमीपत्रातील प्रत्यक्ष ताब्याचे क्षेत्र १२,५२१.२० चौ.मी. असल्याने क्षेत्रफळातील तफावतही समोर आणण्यात आली आहे. नगर रचना योजनेतील हद्दीची तफावत दूर करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ९१ अंतर्गत कार्यवाही आवश्यक असल्याचे शासनाच्या पत्रात नमूद आहे. तरीही ही प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी शासनाने 'ना-हरकत' दिल्याबाबत आक्षेप घेण्यात आला आहे.

**नाल्यांचे अंतर आणि अग्निसुरक्षेवर आक्षेप**
भूखंडावरील दोन नैसर्गिक नाल्यांपासून आवश्यक मोकळी जागा व संरक्षक अंतर न सोडताच बांधकामाला परवानगी दिल्याची तक्रार आहे. आराखड्यात 'लगतचा नाला विकास आराखड्यात दर्शविलेला नाही', अशी नोंद असली तरी प्रत्यक्ष अस्तित्वातील जलप्रवाहापासून राखावयाच्या सुरक्षित अंतराकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सुमारे ४५ मीटर उंच इमारतीसाठी अग्निशमन विभागाच्या संचालकांचे आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले नसल्याचाही आक्षेप आहे. महानगरपालिकेच्या अग्निशमन अधीक्षकांकडून एका दिवसात प्रमाणपत्र देण्यात आल्याचा आरोप असून, त्यांचे मंजुरीचे अधिकार आणि अग्निसुरक्षा नियमांच्या पालनाचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. आमदार संग्राम जगताप यांनी २० ऑगस्ट २०२४ रोजी शासनाला दिलेल्या पत्राचाही या प्रकरणात उल्लेख आहे. सदर मिळकतीशी संबंध नसताना आणि संबंधित भूखंडधारकांनी जमीन खरेदी करण्यापूर्वी त्यांनी पत्र दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. नगर विकास विभागाच्या १७ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या 'ना-हरकत' पत्रात त्याचा संदर्भ आहे. आरक्षण कायम असताना व हद्दीतील तफावत दूर करण्याची प्रक्रिया अपूर्ण असताना या पत्राच्या आधारे शासनाची 'ना-हरकत' मिळवून दिल्याबाबत आक्षेप घेण्यात आला आहे.

नगर रचना संचालकांनी नगर परिषद प्रशासन संचालनालयालाही आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. समितीचा अहवाल मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट करून ठिय्या आंदोलनाचा निर्णय मागे घेण्याचे आवाहन केले आहे.

आरक्षित जमिनीवरील बांधकाम तत्काळ थांबवावे, नियमबाह्य परवानग्या रद्द कराव्यात आणि दोषी आढळणाऱ्यांची वैयक्तिक जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेख यांनी केली आहे.

# गणेशोत्सवाच्या लकी ड्रॉमधील विजेत्यांना लाखोंचे दंतोपचार मोफत

## युनिव्हर्सल डेंटल हॉस्पिटलचा स्तुत्य उपक्रम; रुग्णांना मोठा आर्थिक दिलासा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आरोग्यसेवा ही केवळ व्यवसाय नसून समाजाप्रती असलेली पवित्र जबाबदारी आहे, हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे अधोरेखित झाला आहे. दातांचे आरोग्य हे आपल्या संपूर्ण आरोग्याशी निगडित असते. निरोगी दात म्हणजे निरोगी शरीर, आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्व आणि आनंदी जीवन. त्यामुळे प्रत्येकाने नियमित दंततपासणी करून आपल्या दातांची आणि एकूण आरोग्याची योग्य काळजी घ्यावी.युनिव्हर्सल डेंटल हॉस्पिटलच्या माध्यमातून यापुढेही समाजातील सर्वसामान्य गरजू आणि वंचित रुग्णांना अशाच प्रकारे दर्जेदार व परवडणारी आरोग्यसेवेचे उपक्रम राबविले जातील अशी आशा शिवसेनेचे माजी नगरसेवक सचिन जाधव यांनी व्यक्त केली.

किंग्जगेटरोड रामचंद्रखुंट येथील युनिव्हर्सल एज्युकेशन ट्रस्टच्या युनिव्हर्सल डेंटल केअर अँड मल्टिस्पेशालिटी इम्प्लांट्स हॉस्पिटलतर्फे गणेशोत्सवानिमित्त राबविण्यात आलेल्या विशेष दंतचिकित्सा उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांतर्गत दहा दिवस दंत रुग्णांची तपासणी व उपचार सवलतीच्या दरात करण्यात आले. तसेच सहभागी रुग्णांना कूपन देण्यात आले होते. या कूपनचे लकी ड्रॉ शिवसेनेचे माजी नगरसेवक सचिन जाधव यांच्या हस्ते काढण्यात आले. यावेळी युनिव्हर्सल एज्युकेशन ट्रस्टचे चेअरमन महेबुब शेख,व्हा.चेअरमन मोईद शेख उपस्थित होते. लकी ड्रॉमधील विजेत्यांना लाखो रुपयांचे दंतोपचार मोफत देण्यात आले.

या लकी ड्रॉमध्ये अंजली सुनील वानखेडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्यावर १४ रूट कॅनल उपचार करून २८ दातांवर कॅप बसविण्यात आले. या उपचाराचा अंदाजे खर्च एक लाख रुपये असून, लकी ड्रॉमधील विजेत्या ठरल्यामुळे त्यांना हे उपचार मोफत देण्यात आले.

याशिवाय शेख रुखसाना, सलीम गुलाब बागवान आणि अंबादास कराळे यांचीही दंतोपचारांसाठी निवड झाली. त्यांना प्रत्येकी अंदाजे २५ हजार रुपये खर्चाचे दात बसविण्याचे उपचार मोफत देण्यात आले. या उपक्रमामुळे विजेत्या रुग्णांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. या सर्व रुग्णांची तपासणी तसेच रूट कॅनल व इतर आवश्यक दंतोपचार डॉ. संकेत हराळ, डॉ. मोहिनी उकांडे आणि डॉ. श्रेयस पुंड यांनी केले.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार दंतोपचार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. आरोग्यसेवेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

युनिव्हर्सल एज्युकेशन ट्रस्टचे चेअरमन शेख मेहबूब आणि व्हाईस चेअरमन शेख मोईद यांनी सर्व विजेत्या रुग्णांचे अभिनंदन केले. तसेच रुग्णांना उत्तम आरोग्य लाभावे, अशा शुभेच्छा दिल्या.

# धनंजय डहाळे यांची शेवगाव शहर ब्लॉक काँग्रेस अध्यक्षपदी निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शेवगाव–** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रांताध्यक्ष मा. श्री. हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने अहिल्यानगर दक्षिण ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटी अंतर्गत येणाऱ्या विविध ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये श्री. धनंजय नारायण डहाळे यांची शेवगाव शहर ब्लॉक काँग्रेस अध्यक्षपदी अधिकृत निवड करण्यात आली आहे.

अहिल्यानगर ग्रामीण दक्षिण जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. किरण अण्णासाहेब पाटील यांना पाठवलेल्या अधिकृत पत्रानुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. हे पत्र काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध करण्यात आले आहे.

निवडीबाबत मुख्य मुद्दे: पद: अध्यक्ष, शेवगाव शहर ब्लॉक काँग्रेस कमिटी मान्यता: मा. प्रांताध्यक्ष श्री. हर्षवर्धन सपकाळ जिल्हा नेतृत्व: श्री. किरण अण्णासाहेब पाटील (अध्यक्ष, अहिल्यानगर ग्रामीण दक्षिण जि.कॉं.क.) जारीकर्ता: ॲड. गणेश पाटील (वरिष्ठ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी)

श्री. धनंजय नारायण डहाळे यांच्या या निवडीमुळे शेवगाव शहर आणि परिसरात काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी काळात शहरातील पक्षसंघटन अधिक मजबूत करणे, तळागाळातील नागरिकांपर्यंत पक्षाची ध्येय-धोरणे पोहोचवणे आणि स्थानिक नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी तत्परतेने कार्य करणे याला प्राथमिकता देणार असल्याचे या वेळी व्यक्त करण्यात आले. त्यांच्या या निवडीबद्दल विविध स्तरातून व सर्वपक्षीय मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे

# 'ट्रेकॅम्प'चे तीन सदस्य झाले अधिकृत 'टूर गाईड'

## नाशिक येथे प्रमाणपत्र वितरण, शासनाच्या संकेतस्थळावर होणार नोंद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक पर्यटन स्थळांवर पर्यटकांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन मिळावे आणि पर्यटन संवर्धनाला गती मिळावी या उद्देशाने महाराष्ट्र पर्यटन संचालनालय व इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम व ट्रॅव्हल मॅनेजमेंट (ग्वाल्हेर) यांच्या वतीने विशेष पर्यटक मार्गदर्शक (टूर गाईड) प्रशिक्षण वर्ग घेतला जातो. त्यात नगरच्या 'ट्रेकॅम्प' या प्रतिथयश गिर्यारोहक संस्थेच्या तीन सदस्यांनी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. या प्रशिक्षणार्थींना नाशिक येथे काल प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. हे तिघेही आता शासनाच्या पर्यटन संचालयनालयाचे अधिकृत टूर गाईड झाले आहेत.

पर्यटन संचालनालयाच्या नाशिक उपसंचालक कार्यालयामार्फत आयोजित या शिबिरात आयआयटीटीएम, ग्वाल्हेर येथील तज्ज्ञ प्रशिक्षक चंद्रशेखर बरुआ यांनी मार्गदर्शन केले. या अभ्यासक्रमादरम्यान पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिक कौशल्ये, पर्यटकांशी संवाद, ऐतिहासिक व स्थापत्य वारशाचे महत्त्व, सुरक्षा आणि प्रत्यक्ष 'फील्ड व्हिजिट'द्वारे स्थळांचा अभ्यास अशा विविध पैलूंवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात नगरच्या ट्रेकॅम्प संस्थेचे करिश्मा कोठारी-जोशी, पिपिलिकेश्वर जाधव व साहील बेदमुथा हे तीन सदस्यही सहभागी झाले होते. त्यांनी प्रशिक्षणानंतरच्या मूल्यमापन चाचणीत नेत्रदीपक यश संपादन केले. या प्रशिक्षणार्थींना काल (शुक्रवारी) नाशिक येथील पर्यटन भवनात पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक नंदकुमार राऊत यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केलेले हे सर्वजण आता पर्यटन संचालनालयाचे अधिकृत गाईड म्हणून कार्यरत राहतील. पर्यटकांच्या सोयीसाठी आणि विश्वासार्ह सेवेसाठी या अधिकृत गाईड्सची नावे महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.'ट्रेकॅम्प'च्या माध्यमातून दुर्गभ्रमंती, हेरिटेज वॉक आणि पर्यावरण संवर्धनाचे कार्य सुरू असतानाच आता संस्थेच्या सदस्यांना मिळालेल्या या शासकीय मान्यतेमुळे पर्यटकांना अधिक दर्जेदार व माहितीपूर्ण अनुभव मिळणार आहे.या यशाबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी ट्रेकॅम्प टीमचे कौतुक केले. यासाठी ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी आणि सहसंस्थापक मेघा लाहोटी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. पर्यटन विभागाचे विजय जाधव, शिवाजी गायकवाड, अजीमुद्दिन शेख यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

# शालेय गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावेत - शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड

## सेवा संकल्प अभियानांतर्गत रयत शिक्षण संस्थेत नगर शहरातील मुख्याध्यापकांची सहविचार सभा; नवनियुक्त मुख्याध्यापकांचा सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावणे, त्यांच्यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गोडी निर्माण करणे आणि शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे ही शाळांची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यासाठी मुख्याध्यापकांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करून शालेय गुणवत्ता वाढीसाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहन शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी केले.

सेवा संकल्प अभियानांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या कार्यालयात नगर शहरातील मुख्याध्यापकांची सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत नवनियुक्त मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गायकवाड यांनी उपस्थित मुख्याध्यापकांना मार्गदर्शन करताना शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

शासनाच्या विविध शैक्षणिक योजना, विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या लाभाच्या योजना, ऑनलाइन कामकाज, सेवा संकल्प अभियान, शाळाबाह्य परीक्षा, अन्नसुरक्षा मानके, स्वच्छ हरित विद्यालय आणि नशामुक्त विद्यालय या उपक्रमांची त्यांनी सविस्तर माहिती दिली. या योजनांची अंमलबजावणी करताना मुख्याध्यापकांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी. विद्यार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देतानाच शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, स्वच्छता, सुरक्षितता आणि आरोग्यविषयक जागरूकता वाढविण्यास प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले.

शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देणे, विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणी ओळखून त्यावर उपाययोजना करणे आणि शिक्षकांच्या सहकार्याने गुणवत्तावाढीचे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. बदलत्या शैक्षणिक परिस्थितीत मुख्याध्यापकांनी नवीन उपक्रमांची माहिती घेऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.

या सहविचार सभेत विस्तार अधिकारी सुरेश ढवळे, अरुण पालवे आणि पवार साहेब यांनीही विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती देऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले. सभेमुळे शाळांच्या कामकाजासंदर्भातील महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करण्याची आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी मुख्याध्यापकांना मिळाली.

यावेळी राज्य मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष सुनील पंडित, शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष ज्ञानदेव बेरड, रयत शिक्षण संस्थेचे निरीक्षक बोडखे सर, महापालिका शिक्षण मंडळाचे दादासाहेब नरवडे, कैलास गुंजाळ तसेच नगर शहरातील विविध शाळांचे मुख्याध्यापक आणि प्राचार्य उपस्थित होते. शैक्षणिक योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी एकत्रित प्रयत्न करण्याच्या दृष्टीने ही सहविचार सभा महत्त्वपूर्ण ठरली.

# डेंग्यूमुक्त अहिल्यानगरसाठी नागरिकांनी स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारावी!

**आयुक्त यशवंत डांगे; उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्यासह घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी दादासाहेब रूपवते शाळेत जनजागृती कार्यक्रम; विद्यार्थी व आशा सेविकांचे डेंग्यूविरोधी पथनाट्य**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आपल्या घराची आणि परिसराची स्वच्छता करण्यासाठी बाहेरून कोणी येईल, याची वाट न पाहता प्रत्येक नागरिकाने 'आपली स्वच्छता, आपली जबाबदारी' या भावनेतून पुढाकार घ्यावा. आपल्या गल्लीपासूनच पाणीसाठ्यांची तपासणी करून डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियानात सहभागी व्हावे. यामुळे शहर स्वच्छ, सुंदर व हरित होण्याबरोबरच नागरिकांचे आरोग्यही निरोगी राहण्यास मदत होईल. महानगरपालिकेच्या या अभियानामुळे डेंग्यूच्या रुग्णसंख्येत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे, असे प्रतिपादन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' साप्ताहिक उपक्रमांतर्गत तोफखाना येथील दादासाहेब रूपवते शाळेत जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयुक्त यशवंत डांगे आणि उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी केली. नागरिकांना डेंग्यूच्या प्रतिबंधासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमास आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. मुग्धा साताळकर, शाळेचे प्राचार्य प्रमोद सूर्यवंशी, प्राध्यापक जयंत गायकवाड, डॉ. वृषाली आरु, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. कंचन रच्चा, प्राध्यापक सुनील वाघमारे, पिंटू ढोणे यांच्यासह विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले, डेंग्यू हा शब्द छोटा असला, तरी हा आजार जीवावर बेतू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने आवश्यक ती काळजी घेणे गरजेचे आहे. पावसाळ्यात साथीचे आजार मोठ्या प्रमाणात पसरतात. डेंग्यूचा डास स्वच्छ पाण्यात उत्पन्न होतो आणि दिवसा चावतो. त्यामुळे या आजाराविषयी नागरिकांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने महानगरपालिकेच्या माध्यमातून 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' अभियान राबविण्यात येत आहे.

आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले हे अभियान कौतुकास्पद असून, यामुळे नागरिकांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होत आहे. डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी घराच्या परिसरात पाणी साचू देऊ नये, पाणीसाठ्यांची नियमित तपासणी करावी आणि स्वच्छतेबाबत जागरूक राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

जगासमोर तापमानवाढीचे मोठे संकट उभे राहत आहे. या संकटावर मात करण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची लोकचळवळ उभी राहणे गरजेचे आहे, असे ॲड. जाधव यांनी सांगितले.

पालकमंत्री ग्रीन सिटी अभियानाला सुरुवात झाली असून, वर्षभरात एक लाख वृक्ष लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत ११ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. वृक्ष लावणे आणि आपल्या परिसराची स्वच्छता राखणे ही केवळ शासनाची, महानगरपालिकेची, प्रशासनाची किंवा लोकप्रतिनिधींची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

प्रत्येक पालकाने आपल्या पाल्याप्रमाणे वृक्षांचेही संगोपन व संवर्धन करावे. केवळ वृक्षलागवड करून चालणार नाही, तर लावलेल्या झाडांची नियमित काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अन्यथा भविष्यात तापमानवाढीच्या गंभीर संकटाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

डेंग्यूविषयी नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी आणि प्रतिबंधात्मक उपायांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने दादासाहेब रूपवते शाळेतील विद्यार्थ्यांनी तसेच आशा सेविकांनी डेंग्यूविषयक जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. या माध्यमातून स्वच्छता, पाणीसाठ्यांची नियमित तपासणी आणि डेंग्यू प्रतिबंधासाठी आवश्यक खबरदारी यांचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सृष्टी बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन प्राध्यापक सुनील वाघमारे यांनी केले, तर डॉ. कंचन रच्चा यांनी आभार प्रदर्शन केले.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आढावा बैठकीत संघटनात्मक बांधणीवर भर

**पदाधिकाऱ्यांना सक्रिय होण्याचे आवाहन । पक्षवाढीसाठी जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घ्या; जिल्हा संपर्क प्रमुख नयन कदम यांचे पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक जिल्हा संपर्क प्रमुख नयन कदम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत पक्षाची सद्यस्थिती, संघटनात्मक बांधणी, पदाधिकाऱ्यांची जबाबदारी, नागरिकांच्या समस्या आणि आगामी काळातील पक्षाच्या कार्याची दिशा यावर चर्चा करण्यात आली. पक्षाची ताकद वाढविण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने काम करावे, जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे आणि पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवावेत, असा सूर या बैठकीत व्यक्त करण्यात आला. बैठकीला मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष अवधूत चव्हाण, मुंबई विभाग अध्यक्ष जतिन पवार, जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, शहर उपाध्यक्ष तुषार हिरवे, दीपक दांगट, संकेत व्यवहारे, संदीप चौधरी, विभाग अध्यक्ष प्रशांत जाधव यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. पक्षाच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणे, स्थानिक पातळीवरील समस्या समजून घेणे आणि संबंधित प्रशासनाकडे त्यांचा पाठपुरावा करणे, याबाबत पदाधिकाऱ्यांनी अधिक सक्रिय राहण्याची गरज व्यक्त करण्यात आली. केवळ पदावर राहण्यापेक्षा त्या पदाच्या माध्यमातून समाजासाठी प्रत्यक्ष काम करणे महत्त्वाचे आहे. नागरिकांना अडचणीच्या वेळी मदत करणारी आणि त्यांच्या प्रश्नांसाठी ठामपणे उभी राहणारी संघटना म्हणून मनसेची ओळख निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्नशील राहावे, यावर बैठकीत भर देण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हा संपर्क प्रमुख नयन कदम म्हणाले की, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपली जबाबदारी ओळखून काम केले पाहिजे. पक्षाचे काम केवळ बैठका घेण्यापुरते मर्यादित न ठेवता ते सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडले गेले पाहिजे. परिसरातील नागरिकांना भेडसावणारे पाणी, रस्ते, वीज, स्वच्छता, वाहतूक आणि शासकीय कार्यालयांमधील अडचणी यांसारखे प्रश्न समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी पाठपुरावा केला पाहिजे. जनतेच्या प्रश्नांसाठी कार्यकर्ते उपलब्ध असतील, तर नागरिकांचा पक्षावरील विश्वास वाढेल. प्रत्येक विभागात पक्षाचे काम नियमितपणे सुरू राहणे, नवीन कार्यकर्त्यांना संधी देणे आणि तरुणांना संघटनेशी जोडणे आवश्यक आहे. संघटनात्मक कामात सातत्य, शिस्त आणि परस्पर समन्वय राखल्यास पक्षाला निश्चितच बळ मिळेल.

ते पुढे म्हणाले की, पक्षवाढीसाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्रितपणे काम करणे ही काळाची गरज आहे. वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून संघटनेच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे. पदाधिकाऱ्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधावा, त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात आणि त्या सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत. एखादा प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्याचा पाठपुरावा होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कार्यकर्त्यांनी समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून पक्षाची भूमिका स्पष्ट करावी आणि स्थानिक प्रश्नांवर जनतेच्या बाजूने ठाम भूमिका घ्यावी. प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपापल्या कार्यक्षेत्रात जबाबदारीने काम केले, तर संघटनेची व्याप्ती वाढण्यास मदत होईल. मनसेचे विचार, कार्यपद्धती आणि जनहिताची भूमिका लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी समन्वयाने प्रयत्न करावेत, असे आवाहनही नयन कदम यांनी केले.

# ज्ञानेशकुमारांचा राजीनामा घ्या, एसआयआर रद्द करा!

**अहिल्यानगरमध्ये रिपाइंचे साखळी उपोषण सुरू । मतदार यादीतील कथित घोळाविरोधात एल्गार; समविचारी पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचाही आंदोलनात सहभाग**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मतदार यादीतून नागरिकांना कथितरीत्या चुकीच्या पद्धतीने वगळून त्यांच्या मतदानाच्या घटनात्मक अधिकारावर गदा आणली जात असल्याचा आरोप करत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या वतीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, संबंधित प्रकरणात त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि मतदारांच्या हक्कांवर परिणाम होत असल्याचा आरोप असलेली एसआयआर प्रक्रिया रद्द करावी, या मागण्यांसाठी शुक्रवारी (दि. ९ ऑक्टोबर) अहिल्यानगर शहरातील मार्केटयार्ड चौकात साखळी उपोषण सुरू करण्यात आले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर हे आंदोलन करण्यात आले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह विविध समविचारी पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी घोषणांनी परिसर दणाणून सोडला. आंदोलनात रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, गुलाम शेख, विजय शिरसाठ, अजीम खान, नईम शेख, विल्सन रुकडीकर, स्वप्नील साठे, राहुल ठोकळ, अझीझ शेख, शुभम दारकुंडे, जालिंदर कानडे, लकी वाघमारे, अरबाज शेख, जमीर सय्यद, जावेद शेख, आयन शेख, नजीर देशमुख, पीटर लोंढे, फयाज शेख, रईस शेख, निखिल मगर, शाम ससाणे, तौसिफ शेख, जावेद सय्यद, जफर काझी, योगेश जावळे, फारूक शेख, प्रशांत आठवले, योहान चाबुकस्वार, चिकू गायकवाड,

महिला आघाडी आर पी आय ज्योती पवार, संपदा म्हस्के, मनीषा गायकवाड, विश्रांती पठारे, प्रियंका पठारे, शीतल नाटिकर, रेश्मा जाधव, प्रमिला शिरसाठ आदी सहभागी झाले होते.

या आंदोलनास शिवसेना शहरप्रमुख ( उबाठा ) किरण काळे, माजी नगरसेवक संजय झिंजे, आंबेडकरी चळवळीतील संजय कांबळे, बंडू आव्हाड, सुजित घंघाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष शेखर पंचमुख यांनी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला.

मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पणाने अभिवादन करुन आंदोलनाला प्रारंभ करण्यात आले. त्यानंतर साखळी उपोषणाला सुरुवात झाली. लोकशाही व्यवस्थेत मतदानाचा अधिकार हा नागरिकांच्या सहभागाचा मूलभूत आधार असल्याचे अधोरेखित करत आंदोलकांनी मतदार यादीच्या प्रक्रियेबाबत आक्षेप नोंदवले.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. मतदार यादीतून नागरिकांची नावे वगळली जात असल्याच्या आरोपांची सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच या प्रक्रियेमुळे पात्र मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाहीत, याची खात्री करावी, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला (एसआयआर) विरोध दर्शवत रिपाइंच्या वतीने ही प्रक्रिया रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. मतदार यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत पात्र नागरिकांची नावे चुकीने वगळली गेल्यास त्यांच्या मतदानाच्या हक्कावर परिणाम होऊ शकतो, अशी आंदोलकांची भूमिका आहे. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाची संधी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे मतदार यादीतील नावांबाबत कोणतीही त्रुटी राहू नये, नागरिकांना त्यांची नावे तपासण्याची आणि आवश्यक दुरुस्ती करून घेण्याची संधी मिळावी, तसेच तक्रारींचे वेळेत निराकरण व्हावे, अशी मागणी या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

(पान १ वरून)

## नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोम्बिंग ऑपरेशन

शहरातील कोतवाली, तोफखाना आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यांच्या हद्दीत हे संयुक्त ऑपरेशन राबवण्यात आले. यात अजामीनपात्र वॉरंटमधील २० आरोपींना अटक करण्यात आली. तसेच, जामीनपात्र व पोटगी वॉरंटमधील १६ आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान शहरातील १० सराईत गुन्हेगार गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली. महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे २ गुन्हे आणि महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) नुसार १ गुन्हा दाखल करण्यात आला.

मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ५४ जणांवर केसेस करण्यात आल्या आहेत. याशिवाय, नवरात्रोत्सवाच्या अनुषंगाने पोलिसांनी या वर्षात १ जानेवारी २०२६ ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत तब्बल ५८ पाहिजे असलेल्या आणि फरार आरोपींवर कायदेशीर कारवाई केली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## सीना नदीच्या पूर नियंत्रण रेषेचे अद्ययावत पुनर्सर्वेक्षण करा

पूरप्रवाह आणि भविष्यातील पूरधोके यांचा शास्त्रीय अभ्यास करून घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी पूररेषेसंदर्भात घेतलेल्या शासन निर्णयानुसार गठित तज्ज्ञ समितीच्या कार्यकक्षेत सीना नदीचा विषय समाविष्ट करून आवश्यक अभ्यास करण्यात यावा, अशी मागणी कृती समितीने केली आहे.

पूररेषांचे पुनर्सर्वेक्षण, पूररेषाबाधित क्षेत्रातील अधिकृत इमारतींचा पुनर्विकास आणि विकास नियंत्रण नियमांबाबतच्या तरतुदींचा विचार करताना नदीलगतची परिस्थिती, भविष्यातील विकास, विकासाचा वाढता दबाव, नदीची वहनक्षमता, प्रवाहाची दिशा आणि विद्यमान बांधकामांच्या जोत्यांची पातळी यांसारख्या तांत्रिक बाबी तपासणे आवश्यक असल्याचे समितीने म्हटले आहे.

सीना नदीच्या विद्यमान ब्लू फ्लड लाइन आणि रेड फ्लड लाइनचा आधार, संबंधित सर्वेक्षण, नकाशे, जलवैज्ञानिक निकष आणि तांत्रिक माहिती यांची अधिकृत पडताळणी करावी. आवश्यक असल्यास सक्षम तांत्रिक संस्थेमार्फत अद्ययावत भौगोलिक, जलवैज्ञानिक आणि जलप्रवाहविषयक सर्वेक्षण करण्यात यावे. या सर्वेक्षणातून पूर नियंत्रण रेषेत बदल करण्याची आवश्यकता स्पष्ट झाल्यास लागू कायदेशीर प्रक्रियेनुसार पुढील कार्यवाही करावी, अशी सूचना समितीने केली.

सीना नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाचे काम सुरू असल्याने या कामांचा नदीची वहनक्षमता, पूरप्रवाह, प्रवाहाची दिशा, पाण्याची पातळी आणि पूरग्रस्त क्षेत्रावर होणारा संभाव्य परिणाम यांचा सविस्तर तांत्रिक अभ्यास करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

नदी सुधारणा प्रकल्पाचा अधिकृत आराखडा, तांत्रिक अहवाल आणि जलवैज्ञानिक अभ्यास उपलब्ध असल्यास तो नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करावा. नदी रुंदीकरण व खोलीकरणाची कामे पूर्ण झाल्यानंतर पूर नियंत्रण रेषेचे पुनर्मूल्यांकन करण्याची आवश्यकता आहे किंवा नाही, याबाबत सक्षम तांत्रिक प्राधिकरणाचा अभिप्राय घ्यावा, असेही समितीने सुचविले.

तसेच, शासनाने गठित केलेल्या तज्ज्ञ समितीने सीना नदीसंदर्भात कोणतेही सर्वेक्षण किंवा अभ्यास केला आहे का, याची अधिकृत माहिती पूररेषाबाधित नागरिकांना उपलब्ध करून द्यावी. अहिल्यानगर शहराच्या नवीन नियोजित विकास आराखड्याच्या अनुषंगाने पूररेषेमुळे नागरिकांच्या जमिनी, मालमत्ता, विकासाच्या शक्यता आणि भविष्यातील पुनर्विकासावर होणाऱ्या परिणामांचा विचार करून निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

निवेदन स्वीकारताना आयुक्त यशवंत डांगे यांनी सीना नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाचे काम सुरू असल्याचे सांगितले. या कामासाठी नदीची हद्द निश्चित करणारे खांब लावण्यात आले आहेत; मात्र काही नागरिक ते काढून टाकत असल्याने काम करताना अडचणी निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सीना नदीच्या खोलीकरणासाठी निधी उपलब्ध असून, नदीच्या पात्रात माती टाकून काही ठिकाणी शेती तयार करण्यात आल्याने नदीचे मूळ पात्र आणि रुंदी यावर परिणाम झाल्याचे आयुक्तांनी सांगितले. नदीचे रुंदीकरण व खोलीकरण पूर्ण होणे आवश्यक असून, त्यानंतरच पूररेषेबाबत शासनाकडे पुढील पाठपुरावा करता येईल. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्व नागरिकांनी नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाच्या कामाला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डांगे यांनी कृती समितीच्या माध्यमातून केले.

यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, नगरसेवक महेश लोंढे, रोहन सानप, अभिजीत बुरुडे, प्रकाश जैन, गोरख बोरुडे, प्रिन्स फुलसौंदर, शरद ठाणगे, रत्नाकर कुलकर्णी, अशोक आगरकर, अतुल जाधव, श्याम व्यवहारे, शिवाजी जाधव, अविनाश साळुंखे, अनिल ससाणे, अनिल शिंदे आदींसह सीना नदी पूररेषाबाधित नागरिक कृती समितीचे सदस्य उपस्थित होते.

सीना नदीच्या विद्यमान पूर नियंत्रण रेषेचे अद्ययावत पुनर्सर्वेक्षण करावे. ब्लू फ्लड लाइन व रेड फ्लड लाइनच्या नकाशांची आणि तांत्रिक माहितीची अधिकृत पडताळणी करावी. नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाचा पूरप्रवाहावर होणारा परिणाम तपासावा. शासनाच्या दि. १० फेब्रुवारी २०२६ च्या निर्णयानुसार गठित तज्ज्ञ समितीच्या अभ्यासात सीना नदीचा विषय समाविष्ट करावा. पूररेषेबाबत केलेल्या सर्वेक्षणाची आणि तांत्रिक अभ्यासाची माहिती नागरिकांना उपलब्ध करून द्यावी. अद्ययावत तांत्रिक निष्कर्षांच्या आधारे आणि कायदेशीर प्रक्रियेनुसार पूर नियंत्रण रेषेबाबत पुढील निर्णय घ्यावा.

## उद्योजकांचा महावितरण कार्यालयावर मोर्चा

वेळ येऊ शकते अहिल्यानगर मध्ये उद्योगाची वाढती संख्या आणि विजेची वाढती मागणी लक्षात घेता परिसरात नवीन वीज उपकेंद्र उभारणे किंवा विद्यमान उपकेंद्र ची क्षमता व लोड वाढविणे अत्यंत आवश्यक आहे या संदर्भात आमी संघटनेच्या वतीने यापूर्वी पाठपुरावा केला आहे डिसेंबर पर्यंत हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन मिळाले आहे

राजेंद्र शुक्रे म्हणाले उद्योगांना अखंडित वीज पुरवठा पूर्ण करून देणे ही औद्योगिक विकास साठी अत्यंत महत्त्वाचे बाब आहे वारंवार वीज पुरवठा खंडित होणे हे औद्योगिक उत्पादन, रोजगार आणि संपूर्ण औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होणार आहेत. जवळपास तीस ते चाळीस हजार कामगार एमआयडीसीत कामाला आहेत त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे आम्हाला मिळालेली कामे वेळेत पूर्ण होत नाहीत सातत्याने समस्या सामोरे जावे लागते उद्योग वाढवण्यापेक्षा समस्या लढणे हाच मोठा उद्योग होऊन बसलाय नगरपेक्षा इतर शहरं पुढे गेले आहेत नवीन उद्योग वाढले नाहीत उलट नगर शहराच्या बाहेर उद्योग गेले.नगरमध्ये जे ३० हजार कामगार आहेत ते कमीत कमी लाखभर कामगार असते.

## केजरीवाल, ममता बॅनर्जी, अभिजीत दिपके यांच्यासह हजारो आंदोलक दिल्लीत स्थानबद्ध

आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी, युट्यूबर ध्रुव राठी ते सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपकेंसह अनेकांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. विशेष म्हणजे, मुंबईतही महात्मा गांधींचे नातू तुषार गांधी यांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतलं असून डीएन नगर पोलीस ठाण्यात स्थानबद्ध करण्यात आले आहे. आत्तापर्यंत दिल्ली पोलिसांनी १७०० हून अधिक आंदोलकांना जेरबंद केल्याची माहिती आहे. मात्र, अद्यापही आंदोलनाचा जोर वाढत असून दिल्लीत सरकारविरोधात विरोधी पक्षांचाही संताप पाहायला मिळत आहे.